# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः06.01.2025** **वारःसोमवार**

1. पायाभूत सुविधा विकासात महाराष्ट्र देशात आघाडीवर असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
2. विश्वासार्हता आणि गुणवत्ता हेच सहकारी संस्थांचं भांडवल-केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं मत
3. पत्रकार दिनाच्या पूर्वसंध्येला राज्यातल्या पहिल्या 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स मीडिया हॅकॅथॉन'चं आयोजन आणि
4. बॉर्डर-गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेत ऑस्ट्रेलियाचा 3-1 असा विजय; भारताचा जसप्रीत बुमराह ठरला मालिकावीर

**मुख्यमंत्री-नागपूर**

देशात पायाभूत विकासाची सर्वाधिक कामं महाराष्ट्रात सुरू असून पायाभूत सुविधा विकासात आपलं राज्य आता देशात पहिल्या क्रमांकावर आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. महारेलने राज्यात बांधलेल्या सात उड्डाणपुलांचं लोकार्पण काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नागपूरमधून दूरस्थ प्रणालीद्वारे झालं. त्यावेळी ते बोलत होते. नागपूर जिल्ह्यातील गोधनी, वर्धा जिल्ह्यातील सिंदी रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक, चंद्रपूरमधील बाबूपेठ रेल्वे फाटक, वाशीम रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक तसंच अमरावतीच्या चांदूर रेल्वे फाटकावरील उड्डाणपूल या विदर्भातील 5 रेल्वे उड्डाणपूलांचा; तसंच जळगाव रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक आणि धुळ्याच्या दोंडाईचा मधील रेल्वे फाटकावरील उड्डाणपूलांचं उद्घाटनही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. राज्य शासन आणि रेल्वे मंत्रालयाचा संयुक्त उपक्रम असलेल्या महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेडने 373 कोटी रुपये खर्चून हे 7 उड्डाण पूल बांधले आहेत.

**मुख्यमंत्री-नागपूर**

आदिवासींमध्ये उपजतच क्रीडा गुण असतात; या समाजातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यवसायिक खेळाडू घडवण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन प्रयत्न करत आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. आदिवासी विकास विभागाच्यावतीने नागपूरमध्ये आयोजित तीन दिवसांच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. या स्पर्धेत एकंदर 974 मुलं आणि 900 मुलींनी सहभाग घेतला. नागपुरातल्या भांगडिया फाऊंडेशनच्या एनएसएच क्रिटिकल केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड डायग्नॉसिस सेंटरचं उद्घाटनही काल मुख्यमंत्र्यांनी केलं.

**मुख्यमंत्री-औरंगाबाद**

बीड जिल्ह्यातल्या हत्या प्रकरणाचं राजकारण करू नये, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते काल नागपूरमध्ये पत्रकारांशी बोलत होते. या प्रकरणातल्या पाच आरोपींना पकडण्यात आलं असून, हत्या प्रकरणात सहभागी आणि मदत करणाऱ्यांना देखील सोडणार नसल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले....

दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर, बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी चार पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. यात सक्तीच्या रजेवर पाठवलेल्या प्रशांत महाजन यांचाही समावेश आहे. आता पोलीस निरीक्षक वैभव पाटील केज पोलीस स्थानकाचे प्रभारी म्हणून काम पाहणार आहेत.

**मोर्चा**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ, काल पुण्यात लाल महाल ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात आला. संतोष देशमुख यांच्या कुटुंबांतील सदस्य, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, खासदार बजरंग सोनवणे, मनोज जरांगे पाटील, यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी या मोर्च्यात सहभागी झाले होते.

**गांधीबाग सहकारी बँक-नागपूर**

सहकार क्षेत्रातील संस्थांसाठी विश्वासार्हता आणि गुणवत्ता हेच सर्वांत मोठं भांडवल आहे, असं प्रतिपादन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल नागपूरमध्ये केलं. गांधीबाग सहकारी बँकेच्या इमारतीचं उद्घाटन काल गडकरी यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्राला सहकार क्षेत्राची परंपरा मोठी आहे. देशाला दिशा देण्याची क्षमता यात आहे, असं गडकरी म्हणाले. विदर्भात सहकार क्षेत्रात कर्मचारी आणि संचालकांना उत्तम प्रशिक्षणाची आवश्यकता असं मत त्यांनी व्यक्त केलं.

**सहकारमंत्री-सोलापूर**

राज्यात येत्या पाच वर्षात 10 हजार सहकारी संस्था उभारण्याचं राज्य सरकारचं धोरण आहे, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली. सोलापूरातील श्री सिध्देश्वर सहकारी बँकेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात ते काल बोलत होते. सहकारी चळवळ टिकवायची आणि वाढवायची असेल तर कायद्यात सुसूत्रता आणून कठोर भूमिका घेणं आवश्यक असल्याचं मत पाटील यांनी व्यक्त केलं.

**सहकारी संस्था निवडणूक**

राज्यातील 28 हजार 867 सहकारी संस्थांच्या निवडणूकीची प्रक्रिया आजपासून सुरू होणार आहे, अशी माहिती राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे आयुक्त अनिल कवडे यांनी काल पुण्यात दिली. विधानसभा निवडणुकांमुळे सहकारी संस्थांच्या निवडणुका 31 डिसेंबरपर्यंत पुढे ढकलल्या होत्या. नव्याने प्रारूप मतदार यादी तयार करून सुधारित निवडणूक कार्यक्रम राबवण्याचे आदेशही प्राधिकरणाने दिले आहेत.

**राज्यपाल**

पत्रकार संघटनेने यावर्षीच्या पत्रकार दिनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता ही भविष्यवेधी संकल्पना निवडली आहे; आज कृत्रिम बुद्धिमत्ता माध्यमांसहित सर्व उद्योगांमध्ये एक परिवर्तनकारी शक्ती म्हणून उदयास आली असताना ही निवड महत्त्वाची आहे, असं मत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. पत्रकार दिनाच्या पूर्वसंध्येला मराठी पत्रकार संघानं 'महाराष्ट्राच्या पहिल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स मीडिया हॅकॅथॉन'चं आयोजन केलं होतं, या कार्यक्रमात ते बोलत होते. खरी पत्रकारिता असेल तरच लोकशाही टिकेल असं मत राज्यपालांनी यावेळी व्यक्त केलं. या कार्यक्रमात स्मीता जाधव, यदू जोशी, शीतल पवार, विलास बढे यांना संपादक व्रतस्थ पुरस्कारानं गौरवण्यात आलं. कल्पना जावडेकर आणि निलेश खेडेकर यांनाही सन्मानित करण्यात आलं. हॅकेथॉनमध्ये उत्कृष्ट काम केलेल्या

महाविद्यालयांना बक्षीसं देण्यात आली. विविध माध्यमांचे पत्रकार, पत्रकारिता अभ्यासक्रमाचे तसंच अभियांत्रिकी महाविद्यालयांचे विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<u>भाजपा-नागपूर, मुंबई</u>**

भारतीय जनता पक्षाचं सदस्य नोंदणी महाभियान काल राज्यभर राबवण्यात आलं. नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, रेशीमबाग इथल्या महात्मा फुले सभागृहात, या अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. तर मुंबईत केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्या उपस्थितीत भाजपच्या सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात झाली.

**<u>शरद पवार</u>**

चिपळूणमध्ये वाशिष्ठी डेअरीने आयोजित केलेल्या कृषी आणि पशुधन प्रदर्शनाचं उद्घाटन ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते काल झालं. पशुसंवर्धन आणि दुग्धोत्पादन क्षेत्रात वाशिष्ठी डेअरी करत असलेलं कार्य क्रांतिकारक आहे, असे गौरवोद्गार पवार यांनी काढले. हा महोत्सव नऊ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहे.

**<u>स्वच्छ माझे अंगण स्पर्धा-बीड</u>**

बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात घनकचरा व्यवस्थापनाद्वारे पर्यावरणाबरोबरच वैयक्तिक, नागरी स्वच्छता आणि आरोग्य बळकटीकरणासाठी स्वच्छ माझे अंगण अभियान राबवण्यात येत आहे. त्यात जिल्ह्यातील सुमारे चार लाख 72 हजार 379 कुटुंब सहभागी होणार आहेत. प्रजासत्ताक दिनी या कुटुंबांचा जाहीर सत्कार ग्रामपंचायतीच्या वतीने केला जाणार आहे.

**<u>पायीदिंडी</u>**

सातारा शहरातील भैरोबा डोंगरी ग्रुप आणि गोंदवलेकर महाराज उपासना केंद्राच्या वतीने काल सातारा ते सज्जनगड अशी पायी दिंडी काढण्यात आली. यामध्ये सुमारे 70 समर्थभक्त सहभागी झाले होते. विशेषतः 80 वर्षावरील ज्येष्ठ भक्तांचा यात सहभाग होता. 2010 सालापासून प्रत्येक नवीन वर्षाच्या पहिल्या रविवारी ही दिंडी काढण्यात येते.

**<u>क्रीडा स्पर्धा-जळगाव</u>**

68 व्या राष्ट्रीय शालेय सॉफ्टबॉल क्रीडा स्पर्धेचा प्रारंभ काल जळगाव इथ मंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या स्पर्धेत 21 राज्यांतील 700 खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. सॉफ़्टबॉल सारख्या स्पर्धा विद्यार्थ्यांना सामूहिकतेची भावना आणि शिस्तीचं महत्त्व पटवून देतात, अस गुलाबराव पाटील यावेळी म्हणाले.

**<u>क्रीडा-नांदेड</u>**

नांदेड जिल्ह्यातील माळेगाव इथं काल झालेली कुस्ती स्पर्धा लोहा तालुक्यातील दीप कांगणे यानं जिंकली; त्यानं राम तेलंगे याला मात दिली. जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयोजित विविध पशु,प्रदर्शन आणि दुग्ध स्पर्धेचे निकालही काल जाहीर झाले. आमदार प्रतापराव चिखलीकर यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आलं.

**<u>क्रिकेट</u>**

बॉर्डर-गावस्कर कसोटी क्रिकेट मालिका ऑस्ट्रेलियानं तीन - एक अशी जिंकली आहे. सिडनी इथं झालेल्या पाचव्या सामन्यात भारतीय संघानं दिलेलं 162 धावांचं लक्ष्य ऑस्ट्रेलिया संघानं चार गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केलं. काल तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात झाल्यानंतर भारतीय संघ केवळ 157 धावांवर सर्वबाद झाला.

भारतीय गोलंदाज जसप्रित बुमराहला मालिकावीर तर ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज स्कॉट बोलंड याला सामनावीर घोषित करण्यात आलं. या मालिका विजयामुळं ऑस्ट्रेलिया संघानं कसोटी विश्व करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. त्यांचा सामना आता दक्षिण अफ्रिकेशी होणार आहे.

**हवामान**

विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली. तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किंचित घट झाली आहे. येत्या 24 तासात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून इतरत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपल, नमस्कार